औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची शुक्रवार दिनांक १७.२.९५ रोजी झालेल्या ९६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

१.	आ. श्री. कैलास पाटील	सभापती/औरंगाबाद मंडळ
२.	श्री. प्रकाश मुगदीया	उपसभापती/औरंगाबाद मंडळ
३.	श्री. दे. वि. मून, उपसंचालक, नगररचना औरंगाबाद विभाग.	सदस्य औरंगाबाद मंडळ
४.	श्री. विनायक गायके	-"-
५.	श्रीमती पार्वतीबाई शिरसाठ	-"-
६.	श्री. रामकृष्ण बोबडे	-"-
७.	श्री. प्रल्हाद चापके	-"-
८.	श्री. भास्कर मुंढे, मुख्य अधिकारी/औ.मं.	-"-
९.	श्री. विश्वनाथ थोरे	-"-
१०.	श्री. विनायकराव आनंदराव देशमुख	-"-
११.	श्री. मोहन पाटील टाकळीकर	-"-
१२.	श्री. मतीन काद्री, उपअभियंता आयुक्त म.न.पा. औरंगाबाद यांचे	सदस्य प्रतिनिधी.

विषय क्र.१: दिनांक २९.१०.९४ रोजी झालेल्या ९५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणेबाबत.

....

मुख्य अधिकारी यांनी मागील बैठकीचा कार्यवृत्तांत वाचुन दाखविला. तदनंतर मंडळास माहिती दिली की, श्री. थोरे सदस्य औ.मं. यांनी सेलु येथील स.न. १९ ही जमिन गृहनिर्माण योजनेसाठी चांगली आहे असे दिनांक १४.१२.९४ च्या पत्रान्वये मंडळास कळविले आहे.

त्यावर चर्चा करतांना श्री. थोरे यांनी प्रतिपादन केले की, सेलु येथील नगराध्यक्षांशी चर्चा केली व जमिनीची पाहणी केली. स.न. १९ ही जमिन मोक्यावर आहे व रोडलगत आहे.

मंडळाचे सदस्य श्री. चापके व थोरे यांनी प्रतिपादन केले की, स.न. १९ मधील जमिन खरेदीसाठी/संपादनासाठी बराच वेळ लागेल. त्यामुळे स.न. १४ हीच जमिन मंडळाने खरेदी करावी. त्यावर सविस्तर चर्चा होऊन स.न. १४ पैकीच जमिन खरेदी करावी असा मंडळाने निर्णय घेतला.

तसेच लासूर स्टेशन, फुलंब्री, पुर्णा, हिंगोली येथील गृहनिर्माण योजनेसाठी जमिनीची पाहणी करुन अहवाल मंडळाच्या पदाधिकाऱ्यासाठी अवलोकनार्थ सादर केला तो खालील प्रमाणे.

[१] लासूर

लासूर स्टेशन येथे गृहनिर्माण योजनेसाठी उपयुक्त शासकीय जमिन उपलब्ध नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे गट क्र. १५१ मधील खाजगी जमिन कार्यकारी अभियंता हे पाहुन आलेले आहे व ती सदर जमिन गृहनिर्माण योजनेसाठी योग्य आहे असा त्यांनी अहवाल दिलेला आहे. सदर जमिन मालकाशी बोलणी करावी असे मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले. त्यावर मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, सदर जमिन मालक, जमिन द्यावयास तयार असेल तर त्या जमिनीचा दर हा सहाय्यक संचालक नगररचना यांचेकडून मागवावा लागेल व त्यानंतरच म्हाडा कायदा कलम ५२ अंतर्गत पुढील कार्यवाही करावी लागेल.

[२] मौजे पुर्णा

कार्यकारी अभियंता औरंगाबाद मंडळ यांनी पुर्णा येथील जमिनीचा अहवाल दिलेला आहे तो मुख्य अधिकारी यांनी वाचुन दाखविला. त्यात कार्यकारी अभियंता यांनी असे नमुद केले आहे की, पुर्णा येथे गृहनिर्माण योजना राबविणेसाठी चांगली शासकीय जमिन उपलब्ध नाही. पुर्णा येथील सर्व्हे क्र. १४९ या खाजगी जमिनीपैकी ५.०० हेक्टर जमिन संपादन करणेसाठी प्रस्ताव मंडळास सादर केलेला आहे. यावर चर्चा होऊन म्हाडा कायदा कलम ५२ अंतर्गत पुढील कार्यवाही करावी असे मंडळाने ठरवले.

[३] मौजे फुलंब्री

म. मुख्याधिकारी यांनी प्रतिपादन केले की, फुलंब्री येथील स. क्र. १८ ही जमिन गृहनिर्माण योजना राबविणेसाठी सुचविण्यात आली होती. त्या दृष्टीने कार्यकारी अभियंता यांना सदर जमिनीचा पाहणी अहवाल सादर करण्याविषयी सुचना दिल्या होत्या.

त्यानुसार कार्यकारी अभियंता यांनी अहवाल मंडळास सादर केला आहे व त्यात त्यांनी नमुद केले आहे की, जमिनीच्या मालकी हक्कामध्ये रु. १७, ६५, ९७७/- चा कर्जाचा बोझा आहे.

या विषयी चर्चा करतांना श्रीमती शिरसाठ यांनी प्रतिपादन केले की, या जमिनीवर रु. १७,६५,९७७/- चा बोझा आहे त्या संदर्भात बडोदा बँकेशी चर्चा करावी.

[४] मौजे हिंगोली :

हिंगोली येथील जमिनीचा पाहणी अहवाल मंडळास सादर करण्यांत आला. कार्यकारी अभियंता यांनी अहवालात नमुद केले की, हिंगोली येथे शासकीय अथवा नगरपरिषदेच्या मालकीची जमिन गृहनिर्माण योजनेसाठी उपलब्ध नाही. परंतु हिंगोली शहराच्या विकास आराखड्यामध्ये स.क्र. १४३ या जमिनीपैकी ३.८० हे. जमिन म्हाडाच्या गृहनिर्माण योजनेसाठी आरक्षित असल्याचे दिसून येते. सदर भागातील जमिनीचा अंदाजे दर रु. ७५.०० लाख प्रति हेक्टर [रु.७५/- प्रति. चौ.फुट] एवढा असल्याचे अहवालामध्ये नमुद करण्यांत आले आहे. सदर जमिन संपादन करावयाची असल्यास एम.आर.टी.पी अॅक्ट १९६६ मधील तरतुदीनुसार करावी लागेल.

मंडळाच्या ९५ व्या बैठकीतील विषय क्र. ४ व ठराव क्र. ५७३ वर चर्चा करतांना म.मुख्याधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, मंडळाच्या ठरावानुसार प्राधिकरणास पत्र पाठविण्यांत आले व प्राधिकरणाने त्या अनुषंगाने असे कळविले आहे की, अकलूज येथील गृहनिर्माण योजनेसाठी म्हाडा फक्त तांत्रिक जबाबदारी स्विकारणार असून कर्जाची वसुली कारखाना करणार आहे व अशा प्रकारची जबाबदारी घेण्यास मराठवाड्यातील कोणता कारखाना तयार आहे याची माहिती पाठविण्यांत यावी.

या विषयावर चर्चा करतांना मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले की, म्हाडा तांत्रिक जबाबदारी स्विकारणार म्हणजे नेमके काय करणार याचा बोध होत नाही. त्यासाठी परत प्राधिकरणास सविस्तर पत्र पाठवुन त्यांचेकडून माहिती घ्यावी. साखर कारखान्याने काय करणे आवश्यक आहे व म्हाडा काय करणार आहे याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

मंडळाच्या ९५ व्या बैठकीतील विषय क्र. ७ व ठराव क्र. ५७६ वर चर्चा करतांना म.मुख्याधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, औरंगाबाद येथील निर्मिती केंद्र १९८९ रोजीच नोंदणीकृत झालेले आहे व औरंगाबादचे निर्मिती केंद्र कार्यान्वीत आहे. सदर निर्मिती केंद्राचा प्रगती अहवाल मागविलेला आहे व तो मंडळाचे माहितीसाठी ठेवला आहे.

यावर चर्चा करतांना उपसभापती श्री. प्रकाश मुगदीया यांनी सांगितले की, निर्मिती केंद्राचा फायदा होत असेल तर निर्मिती केंद्राचे काम चालु ठेवावे. यावर मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, ही केंद्र शासनाची योजना आहे व त्यामुळे बांधकामाचे नविन तंत्रज्ञान विकसीत करून स्वस्त किंमतीमध्ये बांधकाम साहित्य तयार करून स्थानिक कामगार वर्गास प्रशिक्षण देणे, स्थानिक गरजा लक्षात घेऊन बांधकामाचे निरनिराळे तंत्रज्ञान विकसीत करणे व त्याचा प्रचार करणे हा या योजनेचा उद्देश आहे.

उपसभापती प्रकाश मुगदीया यांनी या अनुषंगाने प्रतिपादन केले की, निर्मिती केंद्रासाठी मंडळातर्फे तांत्रिक कर्मचारी पुरविण्यांत यावे.

यावर चर्चा करतांना मंडळाच्या सर्व सदस्यांनी प्रतिपादन केले की, प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी औरंगाबाद मंडळातर्फे तांत्रिक कर्मचारी देऊन निर्मिती केंद्राचे मंदावलेल्या कामास चालना द्यावी.

यावर मुख्य अधिकारी यांनी प्रतिपादन केले की, मंडळाच्या सुचनेनुसार प्रत्येक निर्मिती केंद्रास उपलब्ध कर्मचा-यामधनुच तांत्रिक कर्मचारी पुरविण्यांत येईल.

मंडळाच्या १५ व्या बैठकीतील विषय क्र. ८ व ठराव क्र. ५७७ च्या अनुषंगाने मंडळासमोर सादर केलेल्या अनुपालन अहवालावर चर्चा करतांना मंडळाचे सदस्य श्री. गायके यांनी प्रतिपादन केले की, एम. पी. लॉ. कॉलेज समोरील जागेच्या बदल्या तडजोडीनुसार मंडळास जी जमिन मिळणार होती ती ही मंडळास मिळालेली नाही. जी जमिन मंडळाच्या ताब्यात होती ती मंडळाने सोडून दिली व त्या बदल्यात मिळणारी जमिन मंडळास मिळालेली नाही. त्यामुळे म्हाडाचे दोन्ही बाजुने नुकसान झालेले आहे.

तसेच एम. पी. लॉ. कॉलेजसमोरील जमिन सोडतांना व गारखेडा येथील जमिन घेतांना जो करार झालेला अथवा वाटाघाटी झालेल्या आहे. त्यानुसार मुळ जमिन मालकाची जबाबदारी आहे की, त्यांनी म्हाडास जमिन ताब्यात द्यावी.

यावर चर्चा करतांना म. मुख्याधिकारी यांनी प्रतिपादन केले की, गारखेडा येथील मुळ जमिन मालकाचा, जमिन म्हाडाच्या ताब्यात देण्याविषयी काही वाद नाही. परंतु श्री. बी. एन. कुलकर्णी यांनी संपादनाच्या प्रक्रियेवर स्थगिती आणल्यामुळे अद्याप मंडळास ताबा मिळालेला नाही.

मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले की, एस.पी.लॉ. कॉलिजसमोरील जमिनीवर कोणाचे टायटल आहे याचा शोध घ्यावा.

यावर मंडळाचे सदस्य श्री. मोहन पाटील टाकळीकर यांनी सूचना केली की, या संपूर्ण प्रकरणाचा अभ्यास करावा.

चर्चा करित असतांना मंडळाच्या सर्व सदस्यांचे मत झाले की, शासनाच्या आदेशानुसार जमिन मालक व म्हाडा यांच्यात वाटाघाटी/करार झाला त्यानुसार मंडळाने एस.पी.लॉ. कॉलिजच्या समोरील जागेच्या बदल्यात गारखेडा येथील जमिन घ्यावी असे ठरले. मंडळाने एस.पी.लॉ. कॉलिजसमोरील जागा सोडल्यानंतर, जमिन मालकाने गारखेडा येथील जमिन मंडळाच्या ताब्यात देणे हे करारानुसार जमिन मालकावर बंधनकारक होते परंतु तसे झालेले नाही. त्यामुळे मंडळास दोन्ही बाजुने नुकसान सहन करावे लागले.

या प्रकरणात सविस्तर सखोल चौकशी करून तसेच विधी सहाय्यक यांचे या संदर्भात अहवाल मागवावा व हे प्रकरण पुन्हा मंडळाच्या बैठकीत सादर करावे.

मंडळाच्या ९५ व्या बैठकीतील आयत्यावेळच्या विषय क्र. १ ठराव क्र. ५८० च्या संदर्भात तयार करण्यांत आलेल्या अनुपालन अहवालाचे वाचन करण्यांत आले. सन १९९० पासून वर्ग-१ अधिका-यासाठी सेवानिवासस्थानासाठी आरक्षित करण्यांत आलेला गाळा हा वाटपासाठी निदर्शनास न आणून दिल्याबद्दल संबंधीत कर्मचा-यावर काय कार्यवाही करण्यांत आली याबाबत मा. सभापती, उपसभापती व इतर सदस्यांनी विचारणा केली. त्या संदर्भात मुख्य अधिकारी यांनी प्रतिपादन केले की, मंडळाने मान्यता दिल्यास संबंधीत कर्मचा-यांना कारणे दाखवा नोटीस देण्यांत येईल व त्यांचे उत्तर प्राप्त झाल्यावर योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल. तथापी वाटप न झालेल्या गाळ्यांचे प्रचलित दरानुसार किंमत काढून गाळे विकले गेले आहेत. त्यामुळे मंडळाचे नुकसान झालेले नाही.

चर्चेअंती मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले की, संबंधीत जबाबदार कर्मचा-यांना कारणे दाखवा नोटीस देण्यांत यावी.

चर्चेच्या ओघात म. सभापती यांनी सांगितले की, मंडळाच्या अखत्यारीत वेगवेगळ्या वसाहतीत, किती गाळे रिक्त आहेत व कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षित आहेत याची माहिती देण्याविषयी सांगितले होते.

या अनुषंगाने म.मुख्याधिकारी यांनी प्रतिपादन केले की, उक्त माहिती तयार असुन आपणास सदरची माहिती देण्याची व्यवस्था करण्यांत येईल.

मंडळाच्या ९५ व्या बैठकीतील आयत्यावेळचा विषय क्र.३ व ठराव क्र.५८२ अन्वये मंडळाने मागील ६ महिन्यामध्ये दिलेल्या जाहिरातीचा तपशील देण्याविषयी निर्णय घेतला होता.त्यानुसार सदरची माहिती मंडळास सादर करण्यांत आली व त्याची मंडळाने नोंद घेतली.

मंडळाच्या दिनांक २९.१०.९४ च्या ९५ व्या बैठकीच्या पुर्ण कार्यवृत्ताचे वाचन होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र.५८५

दिनांक २९.१०.९४ च्या ९५ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांत वाचुन, सेलु येथील स.नं.१४ मधील जमिन खरेदी करण्याचा वरील प्रमाणे निर्णय घेऊन कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

मंडळाच्या ९५ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांवरील चर्चा संपल्यानंतर सभापती मा.आ.श्री.कैलास पाटील कांही महत्वाच्या कामासाठी बाहेर गेले.त्यांच्या अनुपस्थीत मंडळाच्या बैठकीचे कामकाज उपसभापती श्री.प्रकाश मुगदीया यांच्या अध्यक्षतेखाली चालु ठेवले.

विषय क्र.२: उदगीर नगरपालिकेकडून प्राप्त झालेल्या झोपडपट्टी सुधारणा कामास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास माहिती दिली की, उदगीर न.प.ने उदगीर शहरातील फुलेनगर या झोपडपट्टीतील सुधारणा कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास्तव प्रस्ताव पाठविला आहे. फुलेनगर या झोपडपट्टीची लोकसंख्या २००० असुन दि. ६ फेब्रुवारी १९९२ च्या राजपत्रानुसार घोषित आहे.नगरपालिकेने सादर केलेली अंदाजपत्रके रु. १०,२७,५२९/- ची असुन नियमानुसार त्यास रु. ९,४०,०००/- ची प्रशासकीय मान्यता देता येणे शक्य आहे.

उदगीर शहरासाठी सन १९९४-९५ या वर्षात रु. १.५० लक्षाची आर्थिक तरतुद असुन आजपर्यन्तचा खर्च निरंक आहे.न.प.कडे या वर्षाचि आर्थिक तथा भौतिक उद्दिष्टे साध्य होण्याच्या दृष्टीने सध्या एकही काम हाती नसून या कामास प्रशासकीय मान्यता देता येणे शक्य आहे.

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५८६

उदगीर न.प. कडून प्राप्त झालेल्या फुलेनगर झोपडपट्टीतील सुधारणा कामाच्या प्रस्तावास रू. ९,४०,०००/- ची प्रशासकीय मान्यता खालील अटीवर देण्यांत येत आहे.

अट: नगरपालिकेने प्रस्तावित कामावर केलेल्या खर्चाची प्रतिपुर्ती निधीच्या उपलब्धतेनुसार प्रतिपुर्ती करण्यांत येईल व प्रस्तावित योजनांना अतिरिक्त निधी उपलब्ध झाल्यास तसेच सदर प्रस्तावीत कामांचा खर्च नगरपालिकेने स्वत:च्या निधीतुन केल्यानंतरच प्रतिपुर्ती करण्यांत येईल या अटीवर प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

विषय क्र.३: मौजे कातपूर ता. पैठण येथील पुरग्रस्तांनी घरबांधणी करिता आर्थिक सहाय्यक मिळण्यासाठी केलेल्या मागणीबाबत.

या विषयाची बाब टिप्पणी मुख्याधिकारी यांनी मंडळास वाचुन दाखविली व मंडळास माहिती दिली की, म्हाडामार्फत पुरग्रस्तांसाठी योजना राबविण्यांत येत नाही. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, नैसर्गिक आपत्तीग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी करावयाच्या योजनेचा मुळ मसुदा प्रथमत: जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात बनविला जातो. नंतर शासन स्तरावर या मसुद्याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला जातो. या निर्णयामध्ये म्हाडामार्फत घरांचे बांधकाम करण्याचा निर्णय घेण्यांत आला तरच म्हाडा मार्फत बांधकाम केले जाते.

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५८७

मौजे कातपूर येथील रहिवाश्यांचे अर्जावर निर्णय घेता येणार नाही, अर्जदारांना जिल्हाधिकारी यांचेशी संपर्क साधण्यास कळविनेत यावे.

विषय क्र. ४: औरंगाबाद मंडळाचे सन १९९३-९४ चे वार्षिक लेखे.

मुख्य अधिकारी यांनी औरंगाबाद मंडळाच्या सन १९९३-९४ चे वार्षिक लेखे सादर करतांना वार्षिक लेख्यांबाबत माहिती मंडळास दिली. म. मुख्याधिकारी यांनी चर्चा करतांना मंडळास माहिती दिली की, सन १९९३-९४ मध्ये मंडळ रू. ४२,७५,४७३ ने सरप्लसमध्ये आहे. या बाबीची मंडळाने नोंद घेतली.

ठराव क्र. ५८९

औरंगाबाद मंडळाच्या सन १९९३-९४ चे वार्षिक लेख्यास मंडळाने मान्यता दिली.

विषय क्रं. ५: सन १९९४-९५ या आर्थिक वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक
व सन १९९५-९६ या वर्षाचे प्रस्तावित अंदाजपत्रक.

मुख्य अधिकारी यांनी १९९४-९५ या आर्थिक वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक व सन १९९५-९६ चे प्रस्तावित अंदाजपत्रक मंडळासमोर सादर केले. त्यावेळी सन १९९४-९५ च्या सुधारित अंदाजपत्रकात ८३७.४८ लाख जमा दाखविण्यांत आली आहे व ८०९.१४ लाख रूपये खर्च दाखविण्यांत आला आहे असे मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

त्यावर चर्चा होऊन मंडळाने सन १९९४-९५ चे सुधारित अंदाजपत्रक मंजूर केले.

सन १९९५-९६ च्या प्रस्तावित अंदाजपत्रकात ८४९.३९ लाख रू. जमा दाखविले आहे व ६१०.३७ लाख खर्च दाखविला आहे असे मुख्याधिकारी यांनी सांगितले. त्यावर चर्चा करतांना मंडळाचे सदस्य श्री. मोहन पाटील टाकळीकर यांनी विचारले की, कौठा, मुखेड जि. नांदेड येथिल गृहनिर्माण योजनेचा समावेश १९९५-९६ च्या अंदाजपत्रकामध्ये केलेला आहे का?

तसेच मंडळाचे सदस्य श्री. थोरे यांनी विचारले कि, परभणी व उदगीर येथिल ताब्यात असलेल्या जमिनीवरिल गृहनिर्माण योजनेचा समावेश करण्यांत आला आहे का ?.

तसेच मंडळाचे सदस्य श्री. थोरे यांनी विचारले कि, परभणी व उदगीर येथिल ताब्यात असलेल्या जमिनीवरिल गृहनिर्माण योजनेचा समावेश करण्यांत आला आहे का?

त्यावर म. मुख्याधिकारी यांनी खुलासा केला कि, प्राधिकरणाच्या धोरणानुसार व योजनेची व्यवहार्यता लक्षात घेता या चारही ठिकाणच्या जागेवर विकसीत भूखंडाची योजना प्रस्तावित करण्यांत आलेली आहे.

त्यावर मंडळाच्या सदस्यामध्ये बरीच चर्चा झाली. कौठा, उदगीर, मुखेड व परभणी येथील अर्जदारांची मागणी असूनही जर गृहनिर्माण योजना रद्द करून विकसीत भूखंडाची योजना राबविली तर मंडळाची विश्वासर्हता [illegible] जाईल असे श्री. मोहन पाटील टाकळीकर यांनी प्रतिपादन केले

कौठा, मुखेड, उदगीर व परभणी येथे मंडळाच्या ताब्यातील जागेवर विकसीत भूखंडाची योजना न राबविता गृहनिर्माण योजनाच राबवावी असे मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले.

या विषयावर विस्तृत चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५८९

सन १९९४-९५ या वर्षाच्या सुधारीत अंदाजपत्रकास मंडळ मान्यता देत आहे. सन १९९५-९६ च्या प्रस्तावित अंदाजपत्रकातील जमेच्या बाजुस मंडळ मान्यता देत आहे व खर्चाच्या प्रयोजनात मौजे कौठा, मुखेड, परभणी, उदगीर येथील गृहनिर्माण योजनेचा समावेश करण्यात यावा असे प्राधिकरणास कळविण्यात यावे.

विषय क्र. ६: औरंगाबाद मंडळाच्या न्यायालयीन प्रकरणाकरिता वकीलांचे पॅनेल नेमण्याबाबत.

या विषयाची बाब टिप्पणी म. मुख्याधिकारी यांनी मंडळास वाचुन दाखविली.

या विषयाची चर्चा करत असतांना मुख्याधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, मंडळाची न्यायालयीन प्रकरणे चालविण्याकरिता वकीलांचे पॅनेल नेमण्यासाठी मंडळातर्फे दि. ५.५.१९९३ रोजी जाहिरात देण्यात आली होती. जाहिरातीस अनुसरुन एकुण २२ अर्ज प्राप्त झाले होते. प्राप्त झालेल्या अर्जदारांची नांवे अनुभव, वगैरे सविस्तर माहिती पुढील कार्यवाहीसाठी विधी सल्लागार/प्रा. यांचेकडे पाठविण्यात आली. विधी सल्लागार/प्रा. यांनी त्यांच्या पत्र क्र.१९५७ दिनांक १९.१०.९४ अन्वये असे ठरविले आहे की, उच्च न्यायालयासाठी दोन जेष्ठ वकील व दोन कनिष्ठ वकील असे पॅनेल नेमावे व औरंगाबाद जिल्हा न्यायालयासाठी दोन वकीलांचे पॅनेल तयार करावे तसेच इतर जिल्ह्यासाठी प्रत्येकी एक वकीलांचे पॅनेल असावे.

या विषयावर चर्चा करतांना मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, विधी सल्लागार/प्रा. यांनी असे सुचविले आहे की, मंडळाने उच्च न्यायालयासाठी पॅनेलमध्ये समावेश करण्यासाठी आणखी २ कनिष्ठ वकीलांची नांवे सुचवावीत. तसेच नांदेड/लातूर/उस्मानाबाद जिल्ह्यासाठी प्रत्येकी एका वकीलाचे नांवे सुचवावे.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५९०

वकीलांच्या पॅनलवर खालील वकीलांची नेमणूक करण्यासाठी मंडळ मान्यता देत आहे व उच्च न्यायालयासाठीच्या पॅनेलमध्ये समावेश करण्यासाठी २ कनिष्ठ वकीलाची तसेच नांदेड/लातूर/उस्मानाबाद जिल्ह्याकरिताच्या पॅनलसाठी प्रत्येकी एक या प्रमाणे वकीलांची नेमणूक करण्यासाठी जाहिरात देण्यांत यावी.

अ.क्र.	वकीलाचे नांव/सिनियर/ज्युनियर	स्थळ	न्यायालय
१.	श्री. एच. टी. जोशी [सिनियर ॲड]	औबाद	उच्च न्यायालय
२.	श्रीमती लता बडे [सिनियर ॲड]	औबाद	-"-
३.	श्री. जी. डी. पांडे	औरंगाबाद	जिल्हा न्यायालय
४.	श्री. बसंत चिटणीस	औबाद	कनिष्ठ न्यायालय कामगार, ग्राहकमंच व इतर
५.	श्री. व्ही. जी. चिटणीस	जालना	-"-
६.	श्री. डी. बी. कापसे	परभणी	-"-

विषय क्र. ८: मा. सभापतींच्या परवानगीने आयत्यावेळी येणारे विषय.

[१] सिडको आर-२६ व आर-२७ वरील मध्यम उत्पन्न गट तसेच आर-४३ वरील उच्च उत्पन्न गटांतर्गत गाळ्यांचे किंमतीत झालेला बदल लाभधारकांना कळविणेबाबत.

...

या विषयाची बाब टिप्पणी मुख्याधिकारी यांनी मंडळास वाचुन दाखविली. ६८ गाळे मध्यम उत्पन्न गट, ८८ गाळे मध्यम उत्पन्न गट, ५० गाळे उच्च उत्पन्न गट या तीन योजनेची अनुक्रमे रु. १,८८,०००/-, १,९६,०००/- व ३,५०,००० अशी किंमत जाहिरातीमध्ये दर्शविलेली होती. आता सदरच्या तिन्ही योजनांचे बांधकाम पुर्णत्वास आले आहे व गाळे थोड्या अवधीत ताब्यात द्यावे लागणार आहे. या गाळ्यांच्या बांधकामासाठी लागलेल्या प्रत्यक्ष खर्चावर सुधारीत विक्री किंमत काढण्यांत आलेली आहे ती अनुक्रमे ६८ गाळे, म. उ. गट २,१८,२००/-, ८८ गाळे म. उ. गट २,२६,०००/- व ५० गाळे उ. उ. गट ३,८६,५००/- अशी किंमत निघाली आहे.

[illegible] जाहिरात देते वेळी दाखविलेली किंमत ही त्यावेळी अस्तित्वात असलेल्या दरसुचीवर आधारीत होती. त्यानंतर दरसुचीमध्ये वाढ झाल्यामुळे तसेच सिडकोतर्फे जमिनीवर लावण्यांत आलेला अतिरिक्त भाडेपट्टा, न्युडल चार्जेस भरावे लागल्यामुळे, म. रा. वि. मं. तर्फे विद्युतीकरणापोटी कळविलेल्या अंदाजपत्रकानुसार फार वाढ झाल्यामुळे या किंमती वाढल्या तसेच हडकोने व्याज दरात केलेली वाढ अशा अनेक कारणामुळे गाळ्यांच्या किंमतीत वाढ झाली असल्याचे मुख्याधिकारी यांनी सांगितले.

या विषयावर सविस्तर चर्चा मंडळाच्या सदस्यांनी केली व वाढ झालेली किंमतही प्रत्यक्ष खर्चावर आधारीत आहे. त्यामुळे मान्य करण्यास हरकत नाही असे सांगितले व खालील प्रमाणे निर्णय घेण्यांत आला.

ठराव क्र. ५९१

आर-२६, आर-२७ मध्यम उत्पन्न गटाच्या व आर ४३ वरील उच्च उत्पन्न गट गाळ्यांच्या किंमती खालील प्रमाणे वाढल्या त्यास मंडळाने मान्यता दिली. सदरच्या किंमती लाभधारकांना कळविण्यांत याव्यात.

अ. क्र. योजना	वाढीव किंमत
१. ६८ गाळे मध्यम उत्पन्न गट	२, १८, २००/-
२. आर-२७ वरील ८८ गाळे मध्यम उत्पन्न गट	२, २६, ०००/-
३. आर-४३ वरील ५० उच्च उत्पन्न गट गाळे	३, ८६, ५००/-

पटलावरील विषय संपल्यानंतर मंडळाचे सदस्य श्री. मोहन पाटील टाकळीकर, विश्वनाथ थोरे यांनी मुख्याधिकारी यांना सांगितले की, कौठा, नांदेड, परभणी येथील गाळ्यांची पुन्हा जाहिरात देण्यांत यावी.

मंडळाचे सदस्य श्री. चापके, श्री. देशमुख यांनी प्रतिपादन केले की, पुर्णा, बसमत, गंगाखेड, हिंगोली, औंढानागनाथ, पाथ्री इत्यादी ठिकाणी मंडळातर्फे गृहनिर्माण योजना कार्यान्वीत करण्यासाठी प्रयत्न करण्यांत यावे.

मा. श्री. प्रकाश मुगदीया यांनी हाजी जानमहमंद मोतीवाला यांनी दाखल केलेल्या दिनांक १३. २. ९५ रोजीचा अर्ज मंडळास वाचुन दाखविला व त्यावर चर्चा उपस्थित केली.

या अर्जावर तपासणी करुन सविस्तर अहवाल सादर करावा असे मंडळाच्या सदस्यांनी सांगितले.

पटलावरील विषय संपल्यानंतर उपस्थीतांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले.

.....